**जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत बदल्यांच्या धोरणाची अंमलबजावणी करतांना वेळेत बदल करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**
**शुध्दीपत्रक क्रमांक : जिपब-०८११/प्र.क्र.१२२/आस्था-१४,**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २१ एप्रिल,२०१२

**वाचा :-** शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
क्रमांक:जिपब-०८११/प्र.क्र.१२२/आस्था-१४,दिनांक-२०एप्रिल, २०१२

**शुध्दीपत्रक -** जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या जिल्हांतर्गत सर्वसाधारण बदल्यांबाबतचे धोरण संदर्भाधिन शासन निर्णयान्वये पारित करण्यात आले आहे. शासन निर्णयांतर्गत बदली कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी दिलेल्या काही वेळेत बदल करणे आवश्यक होते. सदर वेळेत बदल्यांचा कार्यक्रमाची अंमलबजावणी होऊ शकणार नाही म्हणून शासन निर्णयामध्ये आवश्यक त्या ठिकाणी पुढीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

1) दिनांक २७ एप्रिल, २०१२ पर्यंत अनुक्रमे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांनी प्रशासकीय आणि विनंती बदल्यांसाठी वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द करुन हरकती/सूचना/आक्षेप मागवावे.
2) परिशिष्ट १, प्रकरण १ मधील ३, ४ व ५ मधील अनुक्रमे सवलतधारक आणि प्राधान्यक्रमातील कर्मचारी यांनी ३१ मार्च पूर्वी पुरावे सादर करण्याऐवजी दिनांक ३ मे, २०१२ पर्यंत सर्व पुराव्यासह अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
3) दिनांक ३ मे, २०१२ रोजी पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती/सूचना/ आक्षेप नोंदवून त्याचे निराकरण करण्यात यावे.

4) दिनांक ७ मे,२०१२ रोजी पर्यंत आक्षेपांचे निराकरण करुन बदलीपात्र कर्मचाऱ्यांची अंतिम यादी मुख्य कार्यकारी अधिकारी/ गट विकास अधिकारी यांच्या स्वाक्षरीने प्रसिध्द करण्यात यावी. उक्त यादी वेबसाईटवर, आणि कार्यालयात ठळक ठिकाणी नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावी.

5) परिशिष्ट १, प्रकरण १ मधील मुद्दा क्र. १८ मध्ये दिनांक ५ मे ते १५ मे या कालावधीत जिल्हास्तरावर आणि दिनांक १६ मे ते २५ मे या कालावधीत पंचायत समितीस्तरावर बदल्या करण्याचे निदेश आहेत. त्याऐवजी दिनांक **१४ मे ते १९ मे** जिल्हास्तरावरील दिनांक **२१ मे ते २५ मे** या कालावधीत तालुकास्तरावरील बदल्या करण्यात याव्यात.

वरील वेळेनुसार कार्यवाही करण्यात यावी. हे आदेश मे, २०१२ अखेर पर्यंत लागू राहतील. इतर अटी व शर्ती कायम राहील.

सदर शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणकीय संकेतांक 201204211446114311001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(व. दा. राठोड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३) मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
४) मा. मंत्री, ग्राम विकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
५) मा. राज्यमंत्री, ग्राम विकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
६) सचिव / विभागीय आयुक्त (सर्व विभाग),
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
८) उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)
९) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दिसाठी अग्रेषित
१०) सर्व कार्यासने, ग्राम विकास विभाग
११) निवडनस्ती, कार्या.क्र. आस्था-१४, ग्रा.वि.व ज.सं.वि., मंत्रालय, मुंबई